महाराष्ट्र विधानसभा

पहिले अधिवेशन, २०२१

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

बोरोळ (ता.देवणी जि.लातूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या परिसर स्वच्छ करण्याबाबत

(१) ७७४ (२२-०३-२०२०). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरोळ (ता.देवणी जि.लातूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीच्या परिसरात काटेरी झुडपांची वाढ झाली असून आरोग्य केंद्राची आतून स्वच्छ दिसणाऱ्या इमारतीचा परिसर बाहेरुन मात्र अस्वच्छ व घाणीने वेढला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिसरातील घाणीमुळे डासांच्या उत्पतीसह अन्य वन्यजीवांचा वावरही वाढण्याचा धोका निर्माण झाला असून तालुक्यात डेंगुच्या रुग्णसंख्येत वाढ होत असून प्राथमिक आरोग्य केंद्राच्या परिसरातील अस्वच्छतेमुळे तेथे येणाऱ्या रुग्णांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (११-०१-२०२१) : (१) हे खरे नाही.

प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत आतून व बाहेरुन स्वच्छ आहे, घाणीने वेढलेली नाही.

(२) हे खरे नाही.

परिसरात घाण नसून डास उत्पतीचे ठिकाण नाही. व अन्य वन्यजीवांचा धोका नाही. रुग्णांचे आरोग्य धोक्यात आलेले नाही. प्राथमिक आरोग्य केंद्राचा परिसर स्वच्छ असून नियमित साफसफाई होते.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

अलिबाग (जि.रायगड) जिल्हा रुग्णालयातील गैरसोयींबाबत

(२) ८२० (२०-०३-२०२०). श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), श्री.महेंद्र दळवी (अलिबाग) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) जिल्हा रुग्णालयात तज्ञ डॉक्टर, परिचारीका तसेच इतर संवर्गातील रिक्त पदे तात्काळ भरावीत, जिल्हा रुग्णालयातील सात महिने बंद असलेला नेत्रविभाग सुरु करावा, नर्सिग कॉलेजच्या इमारतीचे बांधकाम तातडीने पूर्ण करावे, लहान मुलांच्या वॉर्ड मधे होत असलेली पाण्याची गळती थांबवून इमारतीची दुरुस्ती करावी ,बाहयरुग्ण विभागात सी.सी.टिव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत, बाहयरुग्ण विभाग दुपारी चार ते सहा वेळेत सुरु ठेवावा, आंतररुग्ण विभागाच्या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करावे या व इतर मागण्यांकरिता जिल्हयातील सामाजिक संघटना व स्थानिकांनी माहे डिसेंबर,२०१९ मध्ये वा त्यादरम्यान उपोषण केले, हे खरे आहे काय,

(२) तसेच रायगड जिल्हयाच्या सामान्य रूग्णालयात अपघातग्रस्तांसह प्राथमिक उपचारासाठी येणाऱ्या रूग्णांना रूग्णालयातील गैरकारभार, अपुऱ्या सोयीसुविधा, स्वच्छतेचा अभाव आदी बाबींमुळे उपचारापासून वंचित रहावे लागत असून अनेक गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१९ मध्ये सभापती, जिल्हा परिषद महिला व बालकल्याण यांनी अलिबाग जिल्हा रुग्णालयात केलेल्या पाहणीत शौचालयाची अस्वच्छता, डॉक्टरांची अनुपस्थिती, प्रसुती कक्षातील अस्वच्छता, अतिदक्षता विभागातील नादुरुस्त यंत्रसामुग्री,अशा विविध समस्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू जिल्हा सामान्य रूग्णालयात अपघात विभागासाठी असलेली जागा वर्षभरात ३ वेळा बदलण्यात आलेली असून, बदललेल्या सध्याच्या जागेत केवळ दोनच खाटा, स्वच्छतागृहे, हात धुण्याच्या सोयीचा अभाव तसेच संपूर्ण रूग्णालयात अस्वच्छता असल्याने औषधोपचारासाठी येणारा रूग्ण व डॉक्टरांचे तसेच अन्य कर्मचाऱ्यांचे आरोग्य धोक्यात आलेले आहे, हे ही, खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तदनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (११-०१-२०२१) : (१) हे खरे आहे.

तथापि उपोषणकर्त्यांकडून कोणते ही लेखी स्वरुपातील निवेदन जिल्हा रुग्णालय, अलिबाग यांचेकडे दिलेले नाही.

जिल्हा रुग्णालयातील नेत्र विभागात पावसाळयात पाणी गळती झालेमुळे तो बंद ठेवण्यात आला होता. सदर कक्ष दि. १६ डिसेंबर, २०१९ पासून कार्यान्वीत आहे. जीएनएम नर्सिंग स्कूलचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभाग अलिबाग यांचे स्तरावरुन प्रगतीपथावर आहे. बाहयरुग्ण विभागात सी.सी.टी.व्ही. सुरु करण्यात आले असून बाहयरुग्ण विभाग ४ ते ६ या

कालावधीत सुरु करण्यात आलेला आहे. स्ट्रक्चरल ऑडीटची अंदाजपत्रके प्राप्त करुन घेण्यात येत आहेत.

(२) हे खरे नाही.

जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या सर्व रुग्णांना रुग्णालयात उपलब्ध आरोग्य सुविधा पुरविण्यात येतात.

(३) हे अंशतः खरे आहे.

याबाबत रुग्णालयात नियमित स्वच्छतेबाबत जिल्हा रुग्णालय स्तरावर संबंधितांना सूचना देण्यात आल्या असून रुग्णालयात सर्व यंत्रसामुग्री सुस्थितीत कार्यरत करण्यात आलेल्या आहेत.

(४) हे खरे नाही,

जिल्हा रुग्णालय, अलिबाग येथील डायलेसिस विभागामध्ये ४ मशीन कार्यरत होत्या. त्यानंतर रुग्णालयास ७ डायलेसिस मशीन उपलब्ध झाल्या. यामुळे पुरेशा जागेसाठी सदरील डायलेसिस विभाग ट्रामा सेंटरच्या ठिकाणी हलविण्यात आला व ट्रामा सेंटर हे जुन्या डायलेसिस विभागात आवश्यक फेरफार करुन कार्यान्वीत करण्यात आले आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

रायगड जिल्हयातील शासकीय रुग्णालयात सुविधा उपलब्ध करण्याबाबत

(३) ९०१ (२०-०३-२०२०). श्री.महेंद्र दळवी (अलिबाग) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडवली, दिवेआगर, बोर्लीपंचतन, दिघी कुडगांव, शेखाडी (ता. श्रीवर्धन जि. रायगड) येथील अनेक गावांतील रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बोर्लीपिंचतन येथे असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रात साधनसामुग्री अभावी रुग्णांवर प्राथमिक उपचार होईल एवढी औषधेही उपलब्ध नसल्याने रुग्णांना माणगाव, पनवेल,मुंबई या ठिकाणी उपचाराकरीता जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याठिकाणी शासकीय रुग्णालय असूनही सुविधा उपलब्ध नसल्याने जीवघेणा प्रवास करुन माणगाव सारख्या ठिकाणी यावे लागते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुषंगाने शासकीय रुग्णालयात सुविधा उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राजेश टोपे (११-०१-२०२१) : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

बोर्लीपंचतन येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आवश्यक औषधांचा साठा उपलब्ध आहे.

(३) हे खरे नाही.

तथापि गंभीर स्वरुपाचे रुग्ण प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत पुढील उपचारासाठी माणगाव येथे संदर्भित करण्यात येतात.

(४) व (५) प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये निकषानुसार आवश्यक सेवा उपलब्ध आहेत.

भिसी व शंकरपूर (ता.चिमूर, जि.चंद्रपूर) येथील प्राथमिक स्वास्थ केंद्र दर्जोन्नत करून ग्रामीण रुग्णालय करणेबाबत

(४) ११५८ (१३-०४-२०२०). श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिसी व शंकरपूर (ता.चिमूर, जि.चंद्रपूर) येथील प्राथमिक स्वास्थ केंद्रास दर्जोन्नत करून ग्रामीण रुग्णालय करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक ११ डिसेंबर २०१७ रोजी वा त्यासुमारास पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०११ च्या लोकसंखेच्या आधारीत आरोग्य संस्था स्थापनेच्या मूळ बृहत आराखड्यानुसार प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बृहत आराखड्यानुसार प्राथमिक स्वास्थ केंद्र दर्जोन्नतीचा प्रस्ताव असतानाही परिसरातील वैद्यकीय व्यवस्था बंद पडल्याच्या स्थानिकांच्या तक्रारी आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चंद्रपूर जिल्हयातील चिमूर तालुक्याच्या भिसी व शंकरपूर या भौगोलिक महत्वाच्या प्राथमिक स्वास्थ केंद्रास दर्जोन्नत करून ग्रामीण रुग्णालय करणेबाबतचा प्रस्तावाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (१२-०१-२०२१) : (१) होय,हे खरे आहे. (२) नाही, हे खरे नाही.

भिसी व शंकरपूर येथे प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर असुन कार्यरत आहेत.

(३) नाही, हे खरे नाही. भिसी आणि शंकरपूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत वैद्यकीय सेवा देण्यात येत आहे.तसेच भिसी पासून २५ कि.मी आणि शंकरपूर पासून १५ कि.मी अंतरावर चिमूर येथे उपजिल्हा रुग्णालय कार्यरत आहे व तेथे विशेषज्ञ सेवा उपलब्ध आहेत.

(४) सन २०११ च्या जनगणनेवर आधारीत जोडबृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही सुरू असून प्राथमिक आरोग्य केंद्र, भिसी व प्राथमिक आरोग्य केंद्र,शंकरपूर(ता.चिमूर,जि.चंद्रपूर) चे श्रेणीवर्धन ग्रामीण रुग्णालयात करण्याची मागणी निकषानुसार समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

सैलानी (ता.जि. बुलडाणा) येथे मनोरुग्णालय सुरु करणेबाबत

(५) १२७३ (२५-०३-२०२०). श्रीमती श्वेता महाले (चिखली) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सैलानी (ता.जि. बुलडाणा) येथे सैलानी बाबांचे जागतिक दर्जाचे तीर्थस्थान असून येथे दरवर्षी हजारो हिंदू-मुस्लीम भाविक भक्त दर्शनासाठी येत असून त्यामध्ये मानसिक स्थिती खराब झालेले रुग्ण सैलानीबाबांच्या कृपार्शीवादाने बरे होतात अशी मान्यता असल्याने हजारो मनोरुग्ण सैलानी येथे येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मनोरुग्णांची मानसिक स्थितीचा गैरफायदा घेऊन त्यांची शारीरिक, आर्थिक व मानसिक छळवणूक करत असल्याने सैलानी येथे मनोरुग्णालय सुरु करण्याची अनेक वर्षापासूनची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि. २० डिसेंबर, २०१९ रोजी लेखी पत्राद्वारे नागपूर येथे मा. मुख्यमंत्री यांनी घेतलेल्या आढावा बैठकीदरम्यान केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (११-०१-२०२१) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) ठाणे, पुणे, नागपूर व रत्नागिरी येथे शासनाच्या प्रादेशिक मनोरुग्णालयामध्ये राज्यातील सर्व मनोरुग्णांसाठी उपचार सुविधा उपलब्ध आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कामगार रूग्णालय, नागपूर येथील नादुरूस्त लिफ्ट दुरूस्त करणेबाबत

(६) १६४९ (१४-०३-२०२०). ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कामगार व त्यांच्या कुटूंबीयांना आरोग्य सेवा देणा-या नागपूर येथील राज्य कामगार विमा योजनेच्या कामगार रूग्णालयातील लिफ्ट दुरूस्तीकरिता निधी मंजूर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निधी उपलब्ध असूनही लिफ्ट दुरूस्ती न करण्याचे कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तदनुषंगाने रूग्ण व त्यांचे कुटूंबीयांना होणारी गैरसोय टाळण्याकरिता लिफ्ट दुरुस्ती न करणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (११-०१-२०२१) : (१) हे खरे आहे.

(२) सदर रुग्णालयात नवीन लिफ्ट बसविण्यात आली असुन ती कार्यरत करुन घेण्यासाठी आवश्यक परवाना प्राप्त करुन घेण्यात येत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

कोरेगाव (ता.कराड जि.सातारा) येथे गॅस्ट्रो साथीची लागण झाल्याबाबत.

(७) १६६५ (१३-०४-२०२०). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरेगाव, (ता.कराड, जि.सातारा) येथे १५ जणांना गॅस्ट्रोची लागण झाली असून, तीन रुग्ण अत्यावस्थेत असल्याचे दिनांक ४ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गॅस्ट्रोची साथ येण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, गॅस्ट्रोची साथ आटोक्यात आणण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राजेश टोपे (१२-०१-२०२१) : (१) हे अंशत: खरे आहे.

मौजे कोरेगाव (ता.कराड जि.सातारा) येथे दिनांक ४ जानेवरी, २०२० वा त्या दरम्यान गॅस्ट्रोचा १ आणि अतिसाराचे तुरळक स्वरुपातील ३ रुग्ण असे एकूण ४ रुग्ण आढळून आले. ३ रुग्ण कृष्णा हॉस्पीटल कराड अंतररुग्ण म्हणून उपचार घेत होते. त्यांची प्रकृती चांगली असल्याने त्यांना घरी सोडण्यात आले.

(२) १५ दिवसांपूर्वी १५ फूट खोल व ३ फूट रुंदीचा जॅकवेल खोदण्यात आला. त्यातूनच काही भागांमध्ये थेट पाणी पुरवठा करण्यात येत होता. टेंबू धरणाचे पाणी रात्रीच्या वेळी सोडल्यामुळे ते पाणी जॅकवेल मध्ये मिसळले व असे प्रक्रिया विरहीत पाण्याचा थेट पुरवठा झाल्यामुळे लोकांच्या पिण्यात आले. त्यामुळे लोकांना त्रास होवून गॅस्ट्रोची साथ उद्भवली.

(३) दिनांक २.१.२०२० ते ४.१.२०२० अखेर वैदयकीय अधिकारी व कर्मचारी यांचेमार्फत संपूर्ण गावाचे सर्वेक्षण करण्यात आले. सर्वेक्षणात आढळून आलेल्या रुग्णांवर तातडीने उपचार करण्यात आले. घरोघरी मेडीक्लोर चे वाटप करण्यात आले. तसेच पाणी उकळून पिण्याबाबत आरोग्य शिक्षण देण्यात आले. जॅकवेल मधील पाईप जमिनीपासून १५ फूट उंच घेण्यात आली. दैनंदिन पाणी शुध्दीकरण करण्यात आले. पाणी नमुने तपासणी करण्यात आली. थेट करण्यात येणारा पाणीपुरवठा बंद करण्यात आला.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात क्षयरोगामुळे होणारे मृत्यू

(८) २१५८ (१३-०४-२०२०). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे),

श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राजेश पवार (नायगांव) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१९ मध्ये जवळपास ६४७६ रूग्णांचा क्षयरोगाने मृत्यू झाला असल्याचे केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने जाहीर केलेल्या अहवालामध्ये नमुद केले असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१७ मध्ये राज्यात क्षय रोगाने ५ हजार ६६ रुग्णांचे मृत्यू झाले तर सन २०१८ मध्ये हे प्रमाण २८ टक्क्यांनी वाढले असून देशात क्षयरोगामुळे झालेले मृत्यू व रुग्ण संख्यामध्ये उत्तर प्रदेशचा पहिला क्रमांक असून महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, योग्यवेळी वैद्यकीय उपचार न मिळणे, औषधांची उपलब्धता नसणे तसेच वैद्यकीय उपचार अर्धवट सोडल्यामुळे क्षयरोगाच्या रुग्णांच्या संख्येत वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहेत काय, चौकशीत काय आढळून आहे त्यानुसार राज्यात क्षयरोगाचे प्रमाण आटोक्यात आणण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राजेश टोपे (१२-०१-२०२१) : (१) हे अंशत: खरे आहे.

माहे जानेवारी ते डिसेंबर २०१९ मध्ये क्षयरोगामुळे मृत्यू झालेल्या रुग्णांची संख्या ७७८३ इतकी आहे.

(२) हे अंशत: खरे आहे

• सन २०१७ मध्ये ५४२४, सन २०१८ मध्ये ६९५१ व सन २०१९ मध्ये ७७८३ क्षयरोगमुळे मृत्यू झालेल आहेत.

• सन २०१८ मध्ये सन २०१७ च्या तुलनेत सरासरी २८ टक्क्यांनी वाढ झालेली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही

शासनाने केलेल्या उपाययोजना- क्षयरोगाचे सनियंत्रण करण्यासाठी राज्यात ३४ जिल्हा क्षयरोग केंद्रे व ४६ शहर क्षयरोग केंद्रे स्थापन करण्यात आलेले आहेत. राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत ५२९ टी.यू. (क्षयरोग पथक) कार्यरत आहेत. हया मार्फत सनियंत्रण करण्यता येते. संशयित क्षयरुग्णांचा थुंकी नमुना तपासणीसाठी राज्यात १९३५ मान्यता प्राप्त सूक्ष्मदर्शीकेंद्रे स्थापन करण्यात आलेली आहेत. क्षयरोगाचे लवकर निदान होण्यासाठी राज्यात सर्व जिल्हयात एकूण १३१ CBNAAT यंत्रे उपलब्ध केली आहेत. शासकीय अधिकारी व कर्मचारी व्यतिरिक्त केंद्र शासनाने क्षयरोगवर नियंत्रण करण्यासाठी राज्यात करार तत्वावर एकूण २२८१ अधिकारी व कर्मचारी वर्ग मंजूर केला आहे व पूरेसा औषधसाठा उपलब्ध करुन देण्यात आला असून रुग्णांना औषधोपचार करण्यात येत आहे. व पुरेसा औषधसाठा उपलब्ध करून देण्यात असुन रुग्णांना औषधोपचार करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नांदुरा (जि.बुलढाणा) येथे परतीच्या पावसामुळे साथीच्या आजारांमध्ये वाढ झाल्याबाबत

(९) २२४९ (२५-०३-२०२०). श्री.राजेश एकडे (मलकापूर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदुरा, (जि. बुलढाणा) येथे परतीच्या पावसामुळे डेंग्यू व मलेरिया आदी किटकजन्य आजारांच्या रुग्णांमध्ये प्रमाणात वाढ झाल्याचे दिनांक २ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदुरा जिल्हा बुलढाणा येथे डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया आदी किटकजन्य रोगांवर नियंत्रण मिळविण्यास हिवताप विभागाला अपयश आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हिवताप विभागामार्फत गप्पी मासे सोडण्याची प्रभावी उपाययोजना न केल्यामुळे किटकजन्य आजारांमध्ये वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, तदनुषंगाने नांदुरा, जिल्हा बुलढाणा येथे किटकजन्य आजाराला आळा घालण्यासाठी हिवताप विभागाकडून होणाऱ्या हलगर्जीपणा बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राजेश टोपे (१२-०१-२०२१) : (१) हे खरे नाही.

नांदूरा (जि.बुलढाणा) सन २०१९ मधील किटकजन्य आजार किटकजन्य आजार स्थिती खालीलप्रमाणे -

डेंग्यू	मलेरिया	चिकनगुनिया
०	०	०

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

नांदुरा (जि.बुलढाणा) या ठिकाणी १ गप्पी मासे पैदास केंद्र असुन सदर ठिकाणी असलेल्या सर्व ५८ डासोत्पत्ती स्थानांमध्ये सन २०१९ गप्पी मासे सोडण्यास आलेले आहेत.

(४) या प्रकरणाची जिल्हा हिवताप अधिकारी, बुलढाणा यांनी प्राप्त झालेल्या अहवालानुसार चौकशी केली, यामध्ये नांदुर नगरपालिका हद्दीमध्ये किटकजनय आजाराचा सन २०१९ मध्ये एकही रुग्ण आढळून आलेला नाही.

हलगर्जीपणा झाला नसल्यामुळे कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.

किटकजन्य आजारावर नियंत्रणासाठी बुलढाण्यासह राज्यात खालील उपाययोजना नियमितपणे राबविण्यात येतात.

१) नियमित साथरोग सर्वेक्षण.

२) किटकजन्य आजारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी नियमित किटकशास्त्रीय सर्वेक्षण.

३) रुग्णोपचारासाठी पुरेसा औषधसाठा.

४) निदानासाठी प्रयोगशालेय सुविधा.

५) किटकजन्य आजारांसाठी एकात्मिक किटक व्यवस्थापन.

६) उद्रेकाग्रस्त भागात किटकनाशक धुरफवारणी अथवा फवारणी.
७) डासोत्पत्ती रोखण्यासाठी कोरडया दिवसाची अंमलबजावणी होणेबाबत लोकसहभाग.
८) आंतरविभागीय समन्वय.
९) विविध साथरोग प्रतिबंधासाठी जनतेचे आरोग्य शिक्षण.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुक्ताईनगर (जि. जळगांव) येथील उपजिल्हा रुग्णालयात ट्रामा केअर सेंटर उभारण्याबाबत

(१०) ३१६७ (१३-०४-२०२०). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर (जि. जळगांव) तालुक्याला आंतरराष्ट्रीय महामार्ग तसेच औरंगाबाद - इंदौर राष्ट्रीय महामार्गाचे जाळे असून या महामार्गावर नेहमीच छोटे-मोठे अपघात होत असून या अपघातग्रस्तांना मुक्ताईनगर येथील उपजिल्हा रुग्णालयात अत्यावश्यक सोयी-सुविधा नसल्याने जळगांव जिल्हयातील रुग्णालयात घेऊन जावे लागत असल्याने मुक्ताईनगर उपजिल्हा रुग्णालय येथे ट्रामा केअर सेंटर उभारण्यात यावे अशी मागणी तेथील स्थानिकांनी वारंवार शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीसंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (१२-०१-२०२१) : (१) हे अंशत: खरे आहे.

मुक्ताईनगर उपजिल्हा रुग्णालयात अपघाताचे रुग्ण आल्यानंतर आवश्यक उपचार करण्यात येतात गरज असेल तर पुढील उपचारासाठी रुग्णास पुढे संदर्भीत करण्यात येते. मुक्ताईनगर उपजिल्हा रुग्णालय येथे ट्रॉमा केअर सेंटर उभारण्याबाबत मागणी शासनास प्राप्त नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

भिवंडी (जि.ठाणे) येथील स्व. इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालयाच्या आवारात टाकण्यात येणारा जैविक कचऱ्याबाबत

(११) ३३३३ (१३-०४-२०२०). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) स्व. इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालयाच्या आवारात जैविक कचरा उघडयावर टाकला जात असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जैविक कच-यामध्ये सॅनिटरी नॅपकिन, रुग्णांना दिलेली इंजेक्शनचे नीडल व औषधे असल्याने रोगराई पसरण्याचा धोका वाढला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रुग्णालयाला उपजिल्हा रुग्णालय म्हणून दर्जा प्राप्त झाला असतानाही या शासकिय रुग्णालयात रुग्णांना त्या प्रकारच्या सुविधा मिळत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार याबाबत जबाबदार असणा-यांविरुध्द कारवाई करण्यासह जैविक कच-याची योग्य विल्हेवाट लावण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राजेश टोपे (११-०१-२०२१) : (१) हेअंशत: खरे आहे.

यासंदर्भातील बातमी दि. १०.०१.२०२० रोजीच्या दैनिक पुण्यनगरी या वृत्तपत्रामध्ये छापून आली होती. मात्र जैविक कचरा नेण्यासाठी ठेकेदार नेमण्यात आला असून त्याद्वारे नियमित कचरा उचलून नेला जातो.

(२) हे खरे नाही.

जैविक कचरा ठेकेदारामार्फत पुरविण्यात येणाऱ्या कचरा गाडीतून तसेच साधा कचरा महानगरपालिकेच्या घंटागाडीतून दररोज नेला जातो.

(३) हे खरे नाही.

या रुग्णालयातून सी.टी.स्कॅन, क्ष-किरण, सोनोग्राफी, डायलेसिस, प्रयोगशाळा चाचण्या इ. अत्यावश्यक सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

अमरावती सामान्य रुग्णालयात एकाच खाटेवर दोन रुग्णांवर उपचार करावे लागत असल्याबाबत

(१२) ३७९५ (२५-०३-२०२०). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात दर महिन्याला तपासणीसाठी मोठया प्रमाणात रूग्ण येत असल्याने रूग्ण संख्या वाढत असल्यामुळे एकाच खाटेवर दोन रुग्णांवर उपचार करावे लागत असल्याचे दिनांक १ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती शहरात जिल्हा सामान्य रुग्णालयात दिवसाला गंभीर जखमी, विष प्राशन केलेले, भाजलेले असंख्य रुग्ण येथे उपचारासाठी येत असल्याने एका खाटेवर दोन रुग्णांना सलाईन लावण्याची वेळ डॉक्टरांवर आली असल्याने रुग्णांचे जीव धोक्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (१२-०१-२०२१) : (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत खरे आहे.
रुग्णालयात विशेषत: मेडिसीन विभागात जास्त रुग्ण भरती झाल्यामुळे एका खाटेवर दोन रुग्ण ठेवण्यात आले होते.मात्र अतिगंभीर व संसर्गजन्य रुग्णांसाठी वेगळा कक्ष आहे.
(३) सन २०११ च्या जनगणनेवर आधारीत जोडबृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही सुरू असून सामान्य रुग्णालय, अमरावतीचे श्रेणीवर्धन ३७९ खाटांवरून ७०० खाटांमध्ये करण्याची मागणी निकषानुसार समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्ह्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांची प्रलंबित वैद्यकीय बिलांचे प्रस्ताव मंजूर करण्याबाबत

(१३) ३९०० (२४-०७-२०२०). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांची सादर केलेली वैद्यकीय बिले सी.पी.आर. रुग्णालय, कोल्हापूर येथील जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयाकडून वेळेत मंजूर करण्याकरिता प्रस्ताव शिक्षण विभागाकडे तातडीने पाठवावे अशी मागणी स्वाभिमानी शिक्षक संघाच्या वतीने जिल्हा शल्यचिकित्सक यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय खर्चाची रक्कम शासनाकडून देणे बंधनकारक असताना जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयाकडून याबाबत वेळेत प्रस्ताव सादर केले जात नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्ह्यातील किती शिक्षकांचे वैद्यकीय बिलाचे प्रस्ताव प्रलंबित आहेत, त्याची सद्य:स्थिती काय आहे,
(४) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांची सादर केलेली वैद्यकीय बिलांचे प्रस्ताव मंजूर करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (११-०१-२०२१) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) दि.१०/०२/२०२० अखेर २५१ प्रस्ताव प्रलंबित असून अतिरिक्त कर्मचारी उपलब्ध करुन घेऊन तसेच शनिवार व रविवार या साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी कार्यालय सुरु ठेऊन सदर प्रलंबित प्रस्ताव निकाली काढण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

सांगोला (जि.सोलापूर) ग्रामीण रुग्णालयात रूग्णांची होणारी गैरसोय

(१४) ४०४३ (२५-०३-२०२०). श्री.राम सातपुते (माळशिरस) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगोला (जि.सोलापूर) ग्रामीण रुग्णालयात सेवेत असणारे अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून चांगली वागणूक तसेच रूग्णालयातून मोफत औषधे मिळत नसल्याने ग्रामीण भागातील रुग्णांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठीकाणी पुरेसा औषधसाठा उपलब्ध नाही असे सांगण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रुग्णालयात सेवेत असणारे अधिकारी कर्मचारी पुर्णवेळ रुग्णालयात उपस्थित नसल्याने गंभीर अपघात व अन्यवेळी नागरिकांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास येते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाचीची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (११-०१-२०२१) : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही. अत्यावश्यक औषधीसाठा उपलब्ध आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

वाशिम येथील जिल्हा रुग्णालयात सफाई कामगार रुग्णांना इंजेक्शन देत असल्याबाबत

(१५) ४९८६ (२२-०३-२०२०). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम येथील जिल्हा रुग्णालयात सफाई कामगारांकडून रुग्णांना इंजेक्शन दिल्याचे दिनांक २७ जानेवारी, २०२० रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंत्राटी सफाई कामगारांकडून रुग्णांवर उपचार करण्यामुळे रुग्णालयातील व्यवस्थापनाचा बेजबाबदारपणा निदर्शनास आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राजेश टोपे (१२-०१-२०२१) : (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) जिल्हा रुग्णालय, वाशिम यांच्या स्तरावरुन चौकशी केली असून संबंधित कंत्राटी सफाई कामगार यांच्या सेवा समाप्त करण्यांत आल्या असून,कर्तव्यावरील अधिपरीचारीका यांचे वार्षिक वेतनवाढ रोखण्यात आली आहे.तसेच वेळेवर कर्तव्यात हजर न झालेल्या कंत्राटी अधिपरीचारीका अस्थायी असल्याने त्यांच्या सेवा उपसंचालक आरोग्य सेवा,अकोला यांच्याकडे वर्गकरण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उदभवत नाही.

अंबड (जि.जालना) येथील उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांची होत असलेली आर्थिक फसवणूक

(१६) ५३२७ (२२-०३-२०२०). श्री.नारायण कुचे (बदनापूर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबड (जि.जालना) येथील उपजिल्हा रुग्णालय बेडसह एक्सरे, पॅथॉलॉजी, सोनोग्राफी, ब्लड स्टोरेज अशा अत्याधुनिक यंत्रणेने सज्ज असूनही बेडसाठी रुग्णांची आर्थिक लूट सुरू असल्याचे माहे जानेवारी २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णालयातील बहुतांश पंखे व लाईट बंद अवस्थेत असून निम्म्याहून अधिक बेड उचलून ठेवले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तदनुषंगाने रुग्णांची लुट करणा-यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राजेश टोपे (११-०१-२०२१) : (१) व (२) हे खरे नाही.

अबंड, जि. जालना येथील उपजिल्हा रुग्णालय बेडसह एक्सरे, पॅथोलॉजी, सोनोग्राफी, ब्लड स्टोरेज अशा अत्याधुनिक यंत्रणेने सज्ज असून, बेडसाठी रुग्णांची आर्थिक लुट करण्यात येत नाही. रुग्णालयातील बहुतांश पंखे व लाईट चालू स्थितीत आहेत. सर्व उपलब्ध बेड वार्ड मध्ये ठेवण्यात आलेले आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

जिल्हा शासकीय रुग्णालये खासगी संस्थांना चालवायला देण्याबाबत

(१७) ५५६१ (२२-०३-२०२०). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा शासकीय रुग्णालये खासगी संस्थांना चालवायला देण्याची योजना केंद्र शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेबाबतचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेचे स्वरुप काय आहे व सदर योजनाची अंमलबजावणी कधीपर्यंत होणार आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राजेश टोपे (१२-०१-२०२१) : (१) (२) आणि (३) अंशत खरे आहे.

केंद्र शासनाने वैद्यकिय महाविद्यालय स्थापन करण्याबाबत सुधारित नियमावली सन २०१५ ला प्रसिध्द केली.त्यानुसार राज्यातील ३०० खाटांची रुग्णालये व त्याअंतर्गत संलग्नित शासकिय वैद्यकिय महाविद्यालये सुरू करून सार्वजनिक खाजगी भागीदारीवर खाजगी

संस्थेस देण्याबाबत धोरण निश्चितीसाठी दि.२४ जानेवारी २०१८ च्या शासन निर्णयान्वये समिती गठीत केली आहे.सदर समितीचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.तसेच सदर समितीचा अहवाल प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उदभवत नाही.

वसमत (जि.परभणी) तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्राना नवीन रुग्णवाहिका पुरविण्याबाबत

(१८) ५६१७ (२५-०३-२०२०). श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय
(१) वसमत (जि. परभणी) तालुक्यात एक उपजिल्हा रुग्णालय, एक स्त्री रुग्णालय, सहा प्राथमिक आरोग्य केंद्रे व एक नागरी आरोग्य केंद्र असून बाहयरुग्ण सेवेसाठी सुमारे २,०८,७४४ इतके रुग्ण रुग्णसेवेचा लाभ घेत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या सर्व रुग्णालयांमध्ये दरमहा ५०० ते ६०० प्रसुती शस्त्रक्रिया होत असून त्यातील जोखमींच्या गरोदर मातांना प्रसुतीसाठी अनेकदा वसमत तालुक्याचे ठिकाणी पाठविण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वसमत तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्राना शासनामार्फत सन २००७ मध्ये ६ रुग्णवाहिका पुरविण्यात आल्या असून त्यामध्ये वारंवार बिघाड होत असून दुरुस्तीसाठी दरमहा ५० ते ६० हजार रुपये खर्च करावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर सहा प्राथमिक आरोग्य केंद्राना नवीन रुग्णवाहिका पुरविण्यात याव्यात अशी मागणी संबंधित रुग्णालय प्रशासनाकडून दोन वर्षापासून सतत उपसंचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद व संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचेकडे करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांना नवीन रुग्णवाहिका पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. राजेश टोपे (०८-०१-२०२१) : (१) व (२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
बसमत तालुक्यातील ६ प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या रुग्णवाहिका जुन्या झाल्या आहेत व त्यांच्या दुरुस्तीवर खर्च करावा लागतो.
(४) हे खरे आहे.
(५) आरोग्य सेवा आयुक्तालयाकडून सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद यांना डीपीडीसी /मानव विकास /आमदार-खासदार निधीतून अनुदान प्राप्त करुन घेवुन रुग्णवांहिका खरेदी करण्याबाबत कळविण्यात आले आहे. मराठवाडा विकास निधीमधून ४२ लक्ष निधी मंजूर झाला आहे. त्यामधून ५ रुग्णवांहिका खरेदी करण्यास तांत्रिक मान्यता देण्यात आली आहे.

पालघर जिल्हयात प्राथमिक आरोग्य केंद्राची संख्या अपुरी असल्याबाबत

(१९) ६०४९ (२५-०३-२०२०). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय

(१) पालघर जिल्हयात गोरगरीब आदिवासी समाज मोठया प्रमाणात असून प्राथमिक आरोग्य केंद्राची संख्या अपूरी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राथमिक आरोग्य केंद्राची संख्या अपूरी असल्यामुळे गोरगरीब रूग्णांना उपचारासाठी शेजारच्या गुजरात राज्यातील वापी किंवा सिल्वासाला जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने गोरगरीब रुग्णांना तात्काळ उपचार मिळण्यासाठी पालघर जिल्हयात प्राथमिक आरोग्य केंद्राची संख्या वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (११-०१-२०२१) : (१) हे अंशत: खरे आहे.

पालघर जिल्हयात सद्यस्थितीत ५५ प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर आहेत. त्यापैकी ४६ प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यरत आहेत. उर्वरित ९ प्राथमिक आरोग्य केंद्रापैकी ३ ठिकाणी जागा प्राप्त झाली असून त्यांच्या बांधकामाची कार्यवाही सुरु आहे व ६ ठिकाणी जागे अभावी त्यांचे बांधकाम सुरु करता आलेले नाही. तथापि प्राथमिक आरोग्य केंद्राव्यतिरिक्त जिल्हयात १७ प्राथमिक आरोग्य पथके, ४ आयुर्वेदिक दवाखाने, ५ ॲलोपॅथीक दवाखाने व ३फिरती आरोग्य पथके वैद्यकीय अधिकाऱ्यासह कार्यरत आहेत व त्यांचेमार्फत जनतेस आरोग्य सेवा उपलब्ध करुण देण्यात येतात.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) सन २००१ च्या लोकसंख्येवर आधारित पालघर जिल्हयामध्ये शासन निर्णय दि.१७.०१.२०१३ व दि.०९.०६.२०१४ अन्वये ९ प्राथमिक आरोग्य केंद्र व २७ उपकेंद्र मंजूर झाली आहेत. जागेच्या उपलब्धतेनुसार मंजूर आरोग्य संस्था स्थापन करण्याची कार्यवाही सुरु आहे.

राज्यात सध्या महिलांमध्ये कर्करोगाचा वाढत असलेला धोका

(२०) ६४७० (२५-०३-२०२०). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सध्या महिलांमध्ये धुम्रपानाचे प्रमाण मोठया प्रमाणात वाढत असल्यामुळे कर्करोगाचा धोका वाढत असल्याचे दिनांक २७ ऑगस्ट, २०१९ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महिलांमध्ये वाढत असलेले धुम्रपानाचे प्रमाण रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (११-०१-२०२१) : (१) हे खरे नाही.

राष्ट्रीय कुटुंब कल्याण आरोग्य सर्वेक्षणामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या माहितीनुसार सन २००५-०६ मध्ये महिलांमध्ये तंबाखूजन्य पदार्थाच्या सेवनाचे प्रमाण १०.५ % होते ते प्रमाण सन २०१५ - १६ मध्ये ५.८ % झालेले आहे.

(२) व (३) महिलांमध्ये धुम्रपान कमी करण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहे.

(१) सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम ३४ जिल्हयांमध्ये राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत Cigarette and Other Tobacco Prouducts Act २००३ (COTPA Act २००३) ची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यस्तरावर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समन्वय समितीची स्थापना तसेच जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समन्वयक समिती स्थापन करण्यात आली आहे.

(२) राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत शैक्षणिक संस्था तसचे शासकीय संस्था तंबाखू मूक्त करण्यासाठी जनजागृतीपर विविध प्रकारचे उपक्रम चालू आहेत.

(३) तंबाखू नियंत्रण कार्यक्रमातील कार्यरत समुपदेशक महिलांना विशेषत: गरोदर महिलांना तंबाखूजन्य पदार्थाच्या सेवनामुळे होणाऱ्या दुष्परिणामाबाबत अवगत करुन सेवन सोडण्याकरीता समुपदेशन करतात.

(४) राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी होण्याकरीता राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत कार्यरत अधिकारी कर्मचारी यांचे जिल्हास्तर व राज्यस्तरावर प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित केल्या जातात.

(५) कर्करोगाचे वेळेत निदान व उपचार होण्यासाठी कर्करोगाचे तपासणी शिबीरे घेण्यात येतात. प्रत्येक जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालयात व प्राथमिक आरोग्य केंद्र इत्यादी ठिकाणी तंबाखू मूक्तीबाबत मार्गदर्शन व समुपदेशन केले जाते.

अकोला जिल्हयामधील स्त्री रुग्णालयातील वाढीव पदे मंजूरीबाबत

(२१) ६४९७ (२५-०३-२०२०). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हा स्त्री रूग्णालयास शासनाने ३०० खाटा वरून ५०० खाटांचे श्रेणीवर्धन करण्यास विषेश बाब म्हणून माहे मार्च २०१८ मध्ये वा त्यादरम्यान मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्रेणीवर्धीत केलेल्या जिल्हा स्त्री रूग्णालय अकोला कडून आवश्यक वाढीव पदे मंजूरी व भरती करीता शासनाकडे मागणी प्रस्ताव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (१२-०१-२०२१) : (१) होय,हे खरे आहे.
(२) आणि (३) होय, हे खरे आहे.
स्त्री रुग्णालय, अकोला येथे वाढीव २०० खाटांना लागणारी वाढीव पदे निर्मितीची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

मुंबईमध्ये कावीळ या आजाराच्या रुग्णांची वाढत असलेली संख्या

(२२) ६६०६ (१३-०४-२०२०). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईमध्ये माहे फेब्रुवारी २०१९, ते डिसेंबर २०१९ या अकरा महिन्यात कावीळ झालेल्या रुग्णांची संख्या वाढली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ही संख्या मागील दोन वर्षात नोंद झालेल्या रुग्णांच्या संख्येपेक्षा जास्त आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दुषित पाणी आणि आरोग्यास घातक अशा पदार्थांच्या नियमित सेवनाने या रोगाची लागण होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राजेश टोपे (१२-०१-२०२१) : (१) हे अंशत: खरे आहे.
सन २०१९ मध्ये मुंबईत मे महिन्यात काविळच्या रुग्णांची संख्या नियंत्रणात होती. परंतू एल विभागात जलवाहिनीला तडे गेल्यामुळे मे ते ऑगस्ट महिन्यापर्यंत काविळची साथ पसरली होती. बृहन्मुंबई महानगरपालिकेने केलेल्या उपाययोजनांमुळे काविळची साथ आटोक्यात आली.
(२) हे खरे नाही
(३) हे खरे नाही
(४) मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्यातर्फे खालीलप्रमाणे उपाय योजना राबविण्यात येतात.
• जलवाहिनीमध्ये गळती असल्यास ती दुरुस्त केली जाते.
• वस्तीपातळीवर दैनंदिन सर्वेक्षण करण्यात येते.
• पाण्याच्या अतिरिक्त शुध्दीकरणासाठी क्लोरीन गोळयांचे वाटप करण्यात येते.
• प्रतिबंधाच्या विविध उपायाबाबत जनजागृती केली जाते.
(५) प्रश्न उदभवत नाही.

उल्हासनगर येथील मध्यवर्ती हॉस्पिटल मध्ये शवगृहातील वातानुकूलित यंत्रणा नादुरुस्त असल्याबाबत

(२३) ६७३३ (२५-०३-२०२०). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर ३ येथील मध्यवर्ती रूग्णालया मधील शवगृहाचे कुलिंग बंद पडल्याने त्या शवगृहात मृतदेह ठेवले जात नसल्याने हे मृतदेह कल्याण किंवा ठाणे येथे पाठविले जात असल्याचे दिनांक ४ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रूग्णालया मध्ये रुग्णाला न पाहता दुसरीकडे पाठविले जाणे, ॲडमिट असलेल्या रुग्णांना वार्डबॉय तसेच नर्स यांच्या कडून दुय्यम स्वरूपाची वागणूक मिळत असल्याचा आरोप करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (११-०१-२०२१) : (१) हे अंशत: खरे आहे.

मध्यवर्ती रुग्णालय, उल्हासनगर-३ येथील शवगृहामध्ये २ वातानुकुलित यंत्रे असून त्यापैकी एक यंत्र बंद पडले होते. सदर वातानुकूलीत यंत्र अभियंता यांचेकडून दुरुस्त करण्यात आलेले होते. परंतु, कोविड-१९ कालावधीत सदर मशीनचे पंखे अचानक बंद झाले. कोविड-१९ चा प्रार्दुभाव असल्यामुळे सदर दुरुस्ती करीता टेक्निशियन येत नसल्याने दुरुस्ती करणे शक्य झाले नव्हते. तथापि आता सदर बंद असलेले वातानुकूलीत यंत्र उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम (विद्युत विभाग) यांचेडून दि.२०.११.२०२० रोजी दुरुस्त करुन देण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

कारंजा (घा.),(ता.आर्वी, जि. वर्धा) येथील ग्रामीण रूग्णालयाचे रूपांतर उपजिल्हा रूग्णालयामधे करून डॉक्टर व इतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

(२४) ७४९३ (१३-०४-२०२०). श्री.दादाराव केचे (आर्वी) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कारंजा (घा.) (ता.आर्वी, जि. वर्धा) येथे ३० खाटांचे ग्रामीण रूग्णालय असून सदर रूग्णालयाचे रूपांतर ५० खाटांचे उपजिल्हा रूग्णालयामध्ये करण्याबाबत मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुक्यात एकुण ८० ते ९० गावे या रूग्णालयाशी जोडलेले असून रूग्णालयाची इमारत सुसज्ज असूनदेखिल डॉक्टर व इतर कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याने रूग्णांना खाजगी दवाखान्यामध्ये उपचार घ्यावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रूग्णालयाचे रूपांतर उपजिल्हा रूग्णालयामध्ये करण्यासह डॉक्टर व इतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (१२-०१-२०२१) : (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

तालुक्यातील एकूण ९४ गावे ग्रामीण रुग्णालय,कारंजाशी जोडलेली आहेत.सद्यस्थितीत उपलब्ध वैद्यकिय अधिकारी व कर्मचारी यांच्या मार्फतयोग्य ते उपचार दिले जातात आणि आवश्यकतेनुसार वरिष्ठ शासकिय रुग्णालयात संदर्भीत केले जाते.वर्ग १,वर्ग २,वर्ग ३ व वर्ग ४ च्या एकूण मंजूर २९ पदांपैकी १० पदे रिक्त आहेत.

(३) सन २०११ च्या जनगणनेवर आधारीत जोडबृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही सुरू असून ग्रामीण रुग्णालय,कारंजाचे श्रेणीवर्धन ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयात करण्याची मागणी निकषानुसार समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरू आहे वैद्यकिय अधिकारी व इतर कर्मचारी भरती करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

डॉ. स्व. विमलताई मुंदडा विचारमंच अंबाजोगाई (जि. बीड) यांनी केलेल्या मागण्यांबाबत

(२५) ७५०१ (१३-०४-२०२०). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ. स्व. विमलताई मुंदडा यांनी आरोग्य मंत्री असताना श्रीपतरायवाडी (ता. अंबाजोगाई, जि. बीड) येथे वृद्धत्व व जेनेटिक रुग्णालय तसेच लोखंडी सावरगाव-श्रीपतरायवाडी गायरानात शंभर खाटाचे स्त्री रुग्णालय मंजूर केले असून सदरची मंजूर झालेली रुग्णालये त्वरित सुरू करावे यासह अन्य सात मागण्यांबाबतचे निवेदन डॉ.स्व. विमलताई मुंदडा विचारमंच अंबाजोगाई यांनी दिनांक २ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास उपजिल्हाधिकारी अंबाजोगाई जिल्हा बीड यांचेकडे दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली आहे काय, सदर विचार मंच संघटनेने कोणत्या मागण्या शासनाकडे केल्या आहेत,

(३) असल्यास, आतापर्यंत त्यांच्या कोणत्या मागण्या मान्य केल्या आहेत,त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (११-०१-२०२१) : (१) हे खरे आहे.

डॉ. स्व. विमलताई मुंदडा विचारमंच अंबाजोगाई यांनी दिलेले दि. २ नोव्हेंबर, २०१७ चे पत्र प्राप्त करुन घेण्यात आले आहे.

(२) डॉ. स्व. विमलताई मुंदडा विचारमंच यांनी वृध्दत्व आरोग्य व मानसिक आजार केंद्र सुरु करावे, १०० खाटांचे स्त्री रुग्णालय सुरु करावे, आरटीओ ऑफीस इमारतीसाठी निधी उपलब्ध करुन द्यावा व परिसरास डॉ.विमलताई मुंदडा यांचे नाव द्यावे या मागण्या शासनाकडे केल्या होत्या.

(३) व (४) दि. ०६.०२.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये वृध्दत्व आरोग्य व मानसिक आजार

केंद्र रुग्णालयासाठी पदनिर्मिती केलेली असून पदभरतीची कार्यवाही सुरु आहे. स्त्री रुग्णालय व नवजात अर्भक केंद्रासाठी यंत्रसामग्री इ. प्राप्त करुन घेण्यात येत आहे. वृध्दत्व आरोग्य व मानसिक आजार केंद्र तसेच स्त्री रुग्णालय सुरु करणेसाठी आवश्यक ती कार्यवाही चालू आहे.

सद्यस्थितीत कोविड-१९ ची महामारी असल्यामुळे सदर रुग्णालयाचा वापर कोविड-१९ रुग्णालय म्हणून करण्यात येत आहे.

परळ (मुंबई) येथील दादाभाई नौरोजी वाडीया ट्रस्ट रुग्णालयाने शासनास जमा खर्च टाळेबंद सादर न केल्याबाबत

(२६) १०३५१ (०३-०६-२०२०). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळ (मुंबई) येथील दादाभाई नौरोजी वाडीया ट्रस्टच्या महिला प्रसुती व बाल रुग्णालय यास शासन व महानगरपालिकेने माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्या दरम्यान थकित अनुदानापोटी उपलब्ध करुन दिलेल्या ९० कोटी निधीचा जमा-खर्च ताळेबंद अद्याप शासनास सादर केला नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रुग्णालय ट्रस्टींनी प्रत्यक्षात ८०० कर्मचारी असताना दुप्पट १६०० कर्मचारी कागदोपत्री दाखवून व कर्मचारी वेतन देणी आणि औषधे खरेदी खर्चात सुमारे ३० कोटी रुपयांच्या केलेल्या गैरव्यवहार प्रकरणी दक्षता आयोगाने केलेल्या दोन वर्षाच्या लेखा परिक्षणाची मागणी दडपण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (११-०१-२०२१) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अमळनेर (ता.अमळनेर, जि जळगाव) येथील ग्रामीण रुग्णालयाचे उपजिल्हा रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्याबाबत

(२७) १०८०५ (०३-०६-२०२०). श्री.अनिल पाटील (अमळनेर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमळनेर (ता.अमळनेर, जि जळगाव) येथील ग्रामीण रुग्णालयाचे ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्यास शासनाने दिनांक ४ जुलै, २०१९ रोजी वा त्यासुमारास मंजुरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ग्रामीण रुग्णालयाचे उपजिल्हा रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राजेश टोपे (१२-०१-२०२१) : (१) हे अंशत: खरे आहे.
दि. ४ जून २०१९ च्या शासन निर्णयान्वये ग्रामीण रुग्णालय, अमळनेर (ता.अमळनेर, जि जळगाव) चे ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
(२) वाढीव २० खाटांच्या बांधकामाचे अंदाजपत्रक आराखडे तयार करण्याकरीता जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय, जळगाव यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग,जळगाव यांना कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

विदर्भात "सारी" या आजाराच्या प्रादुर्भावामुळे झालेले मृत्यू

(२८) १०८८९ (०३-०६-२०२०). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भात "सारी" या आजाराने आजतागायत ५० जणांचा मृत्यू झाला असल्याची बाब दिनांक २८ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले तदनुसार विदर्भातील सारी रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राजेश टोपे (१२-०१-२०२१) : (१) हे अंशत: खरे आहे. "सारी" (Severe Acute Respiratory Infection) हा आजार नसुन लक्षणांचा समुह आहे. मे २०२० अखेर विदर्भातील ११ जिल्ह्यांमध्ये सारी मुळे ३० जणांचा मृत्यू झाला.
(२) स्वाईन फ्ल्यू, कोरोना तसेच इतरही अनेक आजारामध्ये "सारी" लक्षण समुह आढळतो. सर्व जिल्ह्यांमध्ये सारी रुग्णांचे नियमित सर्वेक्षण करण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे.
(३) "सारी" प्रतिबंध व नियंत्रणासाठी विदर्भासह राज्यात पुढील उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.
१) "सारी" असलेल्या व्यक्तींचे नियमित सर्वेक्षण.
२)"सारी" सर्वेक्षणासाठी शासकिय, खाजगी रुग्णालये आणि प्रयोगशाळा यांचा समन्वय
३) प्रत्येक सारी रुग्णाची कोरोनासाठी प्रयोगशाळा तपासणी, विलगीकरण व उपचार.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पिंपळगाव बसवंत व निफाड (जि.नाशिक) येथील रुग्णालयांचे श्रेणीवर्धन होणेबाबत

(२९) ११४३० (१०-०७-२०२०). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळगाव बसवंत (ता.निफाड, जि.नाशिक) हे रा.म.मा.क्र.३ या मार्गावर वसलेले मोठे शहर असून महामार्गावारील वाढते अपघात व परिसरातील नागरिकांना पिंपळगांव बसवंत येथे उपचारासाठी यावे लागत असल्याने येथील ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालयाचे ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालयात श्रेणीवर्धन तसेच निफाड येथील ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय १०० खाटांचे करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना आजाराचा वाढता प्रादूर्भाव रोखण्यासाठी शासनास अनेक ठिकाणी रुग्णालयांची निर्मिती करावी लागली असल्याने सध्या अस्तित्वात असलेल्या ग्रामीण रुग्णालयाचे उपजिल्हा रुग्णालयांत श्रेणीवर्धन करून ज्या ठिकाणी ३० खाटांचे रुग्णालय आहे तेथे ५० खाटांचे व ज्या ठिकाणी ५० खाटांचे रुग्णालय आहे तेथे १०० खाटांचे रुग्णालय करण्यासदर्भात शासन धोरणात्मक निर्णय घेणार आहे काय,

(३) असल्यास, त्या अनुषंगाने पिंपळगाव बसवंत व निफाड येथील रुग्णालयासंदर्भात लोकप्रतिनीधींनी केलेल्या मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत?

श्री. राजेश टोपे (१२-०१-२०२१) : (१) हे खरे आहे.

(२) व (३) सन २०११ जनगणनेवर आधारीत नवीन रुग्णालय सुरू करणे अथवा कार्यान्वित रुग्णालयांचे श्रेणीवर्धन करण्यासाठी जोडबृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही आयुक्त, आरोग्य सेवा यांच्याकडे सुरू असून पिंपळगाव बसवंत येथील ग्रामीण रुग्णालय व निफाड येथील ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्याची मागणी जोडबृहत आराखड्यामध्ये निकषानुसार समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

कुंडलज (ता.कर्जत,जि.रायगड) येथील एका महिलेचा तिच्या नवजात बालकासह डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे झालेला मृत्यू

(३०) ११५०७ (०९-०९-२०२०). श्री.महेंद्र थोरवे (कर्जत) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुंडलज (ता.कर्जत, जि.रायगड) येथील एका गर्भवती महिलेच्या प्रसूती दरम्यान कर्जत उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे नवजात बालकासह महिलेचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक ०३ मे, २०२० रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करुन दोषी डॉक्टरांवर करवाई करण्यात यावी अशी मागणी मृत महिलेच्या नातेवाईकांनी जिल्हाधिकारी, रायगड आणि जिल्हाचिकित्सक यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने संबधित दोषी डॉक्टरांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राजेश टोपे (११-०१-२०२१) : (१) होय.

(२) सदर मृत महिलेच्या नातेवाईकांनी कर्जत पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे.

(३) व (४) या प्रकरणी निवासी वैद्यकीय अधिकारी (बा.सं) यांच्यामार्फत प्राथमिक चौकशी करण्यात आली आहे. कर्जत येथील शस्त्रक्रियागृहाची दुरूस्तीमुळे तथील शस्त्रक्रियागृह त्यावेळी बंद होते. सदर महिलेस प्रसूतिसाठी सिझेरियनची आवश्यकता असल्याचे लक्षात घेऊन तिच्यावर उपचार करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तिला वेळीच हायर केअर सेंटर वा टर्शरी केअर सेंटर येथे संदर्भित करणे आवश्यक होते. तसे न झाल्याने संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांचा निष्काळजीपणा झाल्याचे मत समितीने नोंदविले आहे. संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांविरूध्द शिस्तभंग विषयक कारवाई प्रस्तावित करण्याच्या सूचना उपसंचालकांनी दिलेल्या आहेत.

जिंतूर (जि.परभणी) शहरातील आरोग्य अधिकारी कार्यालयाच्या इमारतीची झालेली दुरावस्था

(३१) ११६५१ (१४-०९-२०२०). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिंतूर (जि.परभणी) शहरातील आरोग्य अधिकारी कार्यालयाच्या इमारतीची दुरावस्था झाली असल्याचे दिनांक २ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कार्यालयात काम करणारे अधिकारी व कर्मचारी हे आपला जीव धोक्यात घालून काम करत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर इमारतीचे नवीन बांधकाम करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (११-०१-२०२१) : (१) हे खरे आहे.

तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय हे ग्रामीण रुग्णालयाच्या इमारतीत कार्यरत असून सदर इमारतीची दुरावस्था झाली आहे.

(२) हे खरे नाही.

सदर इमारत गळत आहे, त्यामुळे कार्यालयीन कामास अडचणी येत आहेत.

(३) तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय पंचायत समितीच्या किंवा पर्यायी इमारतीत हलविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) कार्यवाही सुरु आहे.

जळगाव जिल्हा व शहरात कोविड-१९ चा प्रार्दुभाव रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

(३२) ११७४७ (०९-०९-२०२०). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हा व शहरात कोविड-१९ चा प्रार्दुभाव जास्त प्रमाणात वाढला असून हा प्रार्दुभाव टाळण्यासाठी प्रशासन अपयशी ठरले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णांना मिळणा-या वैद्यकिय सेवेत व तपासणी अहवाल मिळण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यांस जबाबदार संबधित अधिकारी यांच्यावर काय कारवाई करण्यासह जळगव जिल्हयातील कोविड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राजेश टोपे (१२-०१-२०२१) : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

दि.२२ जुलै, २०२० च्या अहवालानुसार शासकीय वैदयकिय महाविदयालय, जळगाव येथे कोविड १९ निदानाची व्यवस्था असुन याशिवाय मेट्रोपोलिस या खाजगी प्रयोगशाळेचेही सहकार्य घेण्यात येत आहे. जिल्हयामध्ये रॅपीड ॲन्टीजन टेस्टची सुरवात झाली आहे. सध्या या प्रकारची ५००० कीटस् उपलब्ध करण्यात आलेली आहेत.

(३) रुग्णांना वैदयकिय सेवा व तपासणी अहवाल प्राप्त होत नसल्याबाबतची कोणतीही तक्रार या कार्यालयास प्राप्त नसल्याने कोणत्याही अधिकारी यांचेवर कारवाईचा प्रश्नच येत नाही.

कोविड-१९ प्रतिबंध व नियंत्रणासाठी पुढील उपाययोजना करण्यात येत आहे.

(i) फ्ल्यू सदृष्य रुग्णांचे सर्वेक्षण.

(ii) बाधीत रुग्णाच्या निकट सहवासितांचा शोध, निदान व विलगीकरण.

(iii)बाधीत रुग्णाच्या रहिवासी भागात कंटेनमेंट क्षेत्र घोषित करुन सर्वेक्षण व आवश्यकतेनुसार मानवी हालचालींवर निर्बंध.

(iv) कोविड निदानासाठी पुरेशा प्रयोगशाळा

(v) कोविड रुग्णावर उपचारासाठी त्रिस्तरीय रचनेमध्ये पुरेशी रुग्णालय, खाटा व गंभीर रुग्णांसाठी आवश्यक उपचार सुविधा.

(vi) जोखमीच्या भागातून आलेल्या व्यक्तींचे घरी/संस्थात्मक पातळीवर क्वॉरंटाईन.

(vii)कोविड रुग्णोपचार कारणा-या डॉक्टर्स आणि आरोग्य कर्मचा-यांसाठी पुरेशी संरक्षण साधने.

(viii) औषधे व साधन सामुग्रीचा पुरेसा साठा.

(ix) कोविड प्रतिबंध व नियंत्रणासाठी जनतेचे प्रबोधन.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

वैद्यकीय तपासणीचा अहवाल पॉझिटिव्ह आला असताना रुग्णास मुंबईतील शासकीय रुग्णालयात दाखल न करता परस्पर कोल्हापूरला पाठविण्यात आल्याबाबत

(३३) ११७५३ (१४-०९-२०२०). श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे (हातकणंगले) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) खिंडी वरवडे (ता. राधानगरी,जि.कोल्हापूर) येथील ३५ वर्षीय व्यक्ती समवेत दहा वर्षीय मुलाचा मुंबईत झालेल्या वैद्यकीय तपासणीचा अहवाल कोरोना पॉझिटिव्ह आला असताना त्यांना मुंबईतील शासकीय रुग्णालयात दाखल न करता परस्पर कोल्हापूरला पाठविण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या खासगी प्रयोगशाळेमध्ये तपासणी झाली त्या प्रयोगशाळेने तपासणी अहवाल प्रशासनाकडे देण्यास टाळाटाळ केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, तदनुसार तपासणी अहवाल प्रशासनाकडे देण्यास टाळाटाळ करणाऱ्या प्रयोगशाळेवर कारवाई करणेसह अश्या घटना पुन्हा घडू नयेत यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राजेश टोपे (१२-०१-२०२१) : (१) हे अंशत: खरे आहे.

१० वर्षीय मुलीस ब्लड कॅन्सरसाठी टाटा कॅन्सर हॉस्पीटलमध्ये फेब्रुवारी २०२० मध्ये, उपचार सुरु होते. त्यानंतर पुढील उपचाराकरीता एस आर सी सी चिल्ड्रेन हॉस्पीटल मुंबई येथे संदर्भित करण्यात आले. तथापि तेथे खाट उपलब्ध नसल्यामुळे सदर रुग्णास घरी पाठविले तदनंतर कोल्हापुर येथील राजश्री शाहु महाराज वैदयकीय महाविदयालय कोल्हापुर येथील रुग्णालयात दाखल झाल्यानंतर घेतलेला स्वॅब नमुना पॉझिटिव्ह आला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

करोना रुग्णांच्या उपचाराचे बील देण्यास वीमा कंपनीने नकार दिल्याबाबत

(३४) ११७६१ (१४-०९-२०२०). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.चेतन तुपे (हडपसर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) कोरोना आजारावर मात करणाऱ्या एका रुग्णाचे खासगी रुग्णालयातील उपचाराचे बील १ लाख ६६ हजार रुपये इतके झाले असता त्यातील ८१ हजार रुपये कन्झुमेबल चार्ज असल्याचे कारणास्तव सदरची रक्कम देण्यास विमा कंपनीने नकार दिल्याची बाब माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खेर आहे काय,

(२) असल्यास, पी.पी.ई. किटसाठी काही रुग्णालयांकडून जास्त रक्कम आकारण्यात येत असून रुग्णलयात एक किट घालून अनेक रुग्णावर उपचार करण्यात येतात परंतु प्रत्येक रुग्णांकडे त्यासाठी स्वतंत्र आकारणी करण्यात येत असल्याने उपचारांचे बील जास्त येत असून त्याचा भार रुग्णांना सोसावा लागतो आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खासगी रुग्णालयातील कोरोना बाधितांवरील उपचारासाठी अवाजवी शुल्क आकारणा-या रुग्णालयांवर आवश्यक ती कारवाई करण्याचे निर्देश मा.उपमुख्यमंत्री यांनी दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत त्यानुसार विमा कंपनाच्या मनमानी पध्दतीला आळा घालण्याबाबत व खासगी रुग्णालयातील दर नियंत्रित ठेवण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राजेश टोपे (१२-०१-२०२१) : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) खाजगी रुग्णालयातील उपचार खर्चाचा भार सर्वसामान्य रुग्णांना सोसावा लागु नये, यासाठी शासनाने योग्य ती पावले उचलली असुन खाजगी रुग्णालयांची देयकांबद्दल काही तक्रारी असल्यास त्या संदर्भात तक्रार निवारण व्यवस्था निर्माण करण्यात आलेली आहे.
(५) खाजगी रुग्णालयातील दर नियंत्रित ठेवण्यासाठी तसेच त्याचा भुर्दंड सर्वसामान्यांना सोसावा लागु नये सासाठी पुढील कार्यवाही करण्यात आलेली आहे.
-रुग्णांच्या उपचारासाठी खाजगी रुग्णालयांनी आकारावयाच्या दरनिश्चिती बाबत अधिसुचना निर्गमित केल्या आहेत.
-राज्यातील सर्व नागरिकांना महात्मा फुले जन आरोग्य योजना लागु करण्यात आली आहे.
-चॅरिटेबल रुग्णालयातील १० टक्के खाटा गरीब रुग्णांसाठी मोफत राखीव ठेवण्याचे निर्देश तर आणखी १० टक्के खाटा आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांसाठी सवलतीच्या दरात राखीव ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.
-खाजगी रुग्णालयातील देयकांवर नजर ठेवण्यासाठी लेखा परिक्षकांची नेमणूक केली आहे.
-खाजगी रुग्णालयांच्या बीलांबद्दल जनतेच्या तक्रारी सोडविण्यासाठी तक्रार निवारण व्यवस्था केली.
-खाजगी प्रयोगशाळांच्या कोविड निदान चाचणी ची दरनिश्चिती तसेच मास्क चे दर निश्चित केले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

शिरुर-हवेली (जि.पुणे) येथे कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी तालुकास्तरावर सुसज्ज रुग्णालयाची उभारणी करणेबाबत

(३५) १२०८२ (१०-०९-२०२०). श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.चेतन तुपे (हडपसर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोविड-१९ या संसर्गजन्य आजाराचा प्रादुर्भाव मोठया प्रमाणावर वाढत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आजाराचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने शिरुर-हवेली (जि.पुणे) मतदारसंघात तालुकास्तरावर सुसज्ज असे रुग्णालय उभारणेबाबत नागरिकांकडून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (१२-०१-२०२१) : (१) तात्कालीन परिस्थितीत कोविड -१९ या संसर्गजन्य आजाराचा प्रादुर्भाव वाढत होता. तथापि सदयस्थितीत प्रादुर्भाव नियंत्रणाखाली आहे.
(२) हे खरे आहे.
(३) शासकीय मुलींचे वसतिगृह शिरुर येथे १ कोविड निगा केंद्र सुरु केले असुन सदर केंद्राची क्षमता १०० बेडची आहे. याशिवाय हवेली तालुकयामध्ये २ कोविड निगा केंद्र १) भारतीय जैन संघटना कॉलेज हॉस्टेल, वाघोली (२०० बेड क्षमता) २) सिंहगड टेक्निकल इन्स्टीटयुट, आंबेगाव (२०० बेड क्षमता) येथे सुरु करण्यात आली आहेत. तसेच हवेली येथे २ कोविड रुग्णालये सुरु करण्यात आली आहेत. १) श्रीम.काशिबाई नवले वैदयकिय कॉलेज, न-हे, हवेली (१५० बेड क्षमता) २) विप्रो रुग्णालय, हिंजवडी, हवेली (४३९ बेड क्षमता)
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात कुष्ठरोग मुक्तीसाठी विशेष मोहिम राबविणेबाबत

(३६) १२२६२ (१४-०९-२०२०). श्री.चेतन तुपे (हडपसर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सार्वजनिक आरोग्य विभाग अंतर्गत राबविलेल्या "कुष्ठरुग्ण शोध मोहिमे अंतर्गत राज्यातील ३५ जिल्हयांत ७,११८ नवे कुष्ठरुग्ण आढलेले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात दिनांक २३ ते २८ सप्टेंबर, २०१९ या काळात शोधमोहिम राबविण्यात आली असून काही जिल्हयांमध्ये ५ ऑक्टोबर पर्यंत ही मोहिम राबविण्यात आली असून या मोहिमेत राज्यातील ८,५६,१३,२८१ लोकसंख्येचे सर्वेक्षण होणे अपेक्षित होते मात्र त्यापैकी ७,९०,०६,१२३ लोकसंख्येचे सर्वेक्षण झाले असून त्यामध्ये अनेक कुष्ठरुग्ण आढळले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात कुष्ठरोग मुक्तीसाठी विशेष मोहिम राबविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत?

श्री. राजेश टोपे (१२-०१-२०२१) : (१) हे अंशत: खरे आहे.
राज्यात राबविलेल्या “कुष्ठरुग्ण शोध मोहिम” राज्यातील ३५ जिल्ह्यात ६,११६ नवीन कुष्ठरुग्ण आढळलेले आहेत आणि त्यांना उपचाराखाली आणण्यात आले आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

राज्यात दिनांक १३ ते २८ सप्टेंबर २०१९ या काळात शोध मोहिम राबविण्यात आली आणि मुंबई, ठाणे, पालघर जिल्ह्यांमध्ये पोलीयो मोहिम असल्याने ही मोहिम दि.२२ सप्टेंबर ते ७ ऑक्टोबर व कोल्हापूर, सांगली जिल्ह्यामध्ये पूर परिस्थिती असल्याने दि.१० ऑक्टोबर ते २५ ऑक्टोबर दरम्यान राबविण्यात आली.

या मोहिमेत राज्यातील ८,६६,२५,२३० लोकसंख्येचे सर्वेक्षण होणे अपेक्षित होते त्यापैकी ७,५९,५८७ लोकसंख्येचे सर्वेक्षण झाले आहे.

या मोहिमेत ६,११६ नवीन कुष्ठरुग्ण आढळलेले आहेत.

(३) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, दि.१८ ऑक्टोबर, २०१८ नुसार स्पर्श कुष्ठरोग दूरीकरण कार्यक्रमांतर्गत खालील विशेष मोहीमा राबविण्यात येत आहे.

- कुष्ठरुग्ण शोध मोहिम (Leprosy Case Detection Campaign)
- Post Exposure Prophylaxis (PEP) - नवीन शोधलेल्या सर्व कुष्ठरुग्णांच्या सर्व सहवासितांची तपासणी केली जाते. सहवासितांमध्ये कुष्ठरोगाचा प्रसार होऊ नये म्हणून या सर्व सहवासितांमध्ये कुष्ठरोगाचा प्रसार होऊ नये म्हणून या सर्व सहवासितांना रिफांम्पीसीन या गोळीची एक मात्रा दिली जाते.
- विकृती प्रतिबंध व वैदयकीय पुनर्वसन (DPMR) विकृती आलेल्या रुग्णांना एम.सी.आर. चप्पल, गॉगल, सेल्फ केअर कीट व भोगिकोपचार दिल्या जातो तसेच पुनर्रचनात्मक शस्त्रक्रिया केल्या जाते.
- स्पर्श कुष्ठरोग जनजागृती मोहीम (SPARSH) महात्मा गांधी यांच्या पुण्यातिथी दिनी (३० जानेवारी कुष्ठरोग निवारण दिन) ग्रामसभेचे आयोजन करुन कुष्ठरोगाविषयी शास्त्रीय माहिती देवून जनजागृती केली जाते. कुष्ठरोगाविषयीचे गैरसमज दूर करण्यात येतात, तसेच कुष्ठरुग्णांकरिता असलेल्या शासकीय योजनांची माहिती दिल्या जाते.
- "०" रुग्ण गाव सर्वेक्षण मागील ३ वर्षात ज्या गाव/वार्डात रुग्ण आढळून आले नाही, अशा गाव /वार्डात सर्वेक्षण.
- Focussed Leprosy Campaign (FLC) ज्या गाव/वार्डात नवीन शोधलेल्या रुग्णांमध्ये विकृती असलेले रुग्ण व बालरुग्ण निदान झाले अशा गाव/वार्डात सर्वेक्षण करणे.
- Hard to Reach Area राज्यातील अतिदुर्गम भागात आरोग्य शिक्षण व जनजागृती करणे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला येथील कोविड रुग्णालयातील गैरसोयीबाबत.

(३७) १२३८१ (१४-०९-२०२०). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला येथील कोविड रुग्णालयास महाराष्ट्राचे विरोधी पक्ष नेते यांनी दिनांक २९ जून, २०२० रोजी भेट दिली असता तिथे जेवण, पिण्याचे पाणी व स्वच्छता याबाबतच्या तक्रारी तेथील रुग्ग्णांनी त्यांच्याकडे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत महाराष्ट्राचे विरोधी पक्ष नेते यांनी सर्व उपाययोजना व्यवस्थित करणेबाबत तातडीने कार्यवाही करण्याची मागणी विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी, अकोला व इतर यंत्रणांच्या प्रमुखांना केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (१२-०१-२०२१) : (१) हे अंशत: खरे आहे.
अकोला येथील कोविड रुग्णालयास महाराष्ट्राचे विरोधी पक्ष नेते यांनी दि २९.०६.२०२० रोजी भेट दिली, हे खरे आहे. तथापि त्यावेळी तेथील कोणत्याही रुग्णाने जेवण, पिण्याचे पाणी अथवा स्वच्छतेबाबत त्यांच्याकडे तक्रार केलेली नाही.
(२) हे खरे नाही.
अकोला कोविड रुग्णालय येथे महाराष्ट्र विधानसभा विरोधी पक्ष नेते यांनी दि २९.०६.२०२० रोजी भेट दिली असता संबंधितांना रुग्णास देण्यात येणारे जेवण उत्तम व दर्जा चांगला असल्याचे अभिप्राय दिले, तसेच रुग्णालय व कोविड सेंटर मधील स्वच्छते बाबत समाधान व्यक्त केले व मा. महोदयांनी संबंधित रुग्णांचे रुग्णपत्रिकांची तपासणी केली असता त्यामध्ये रुग्णांना देण्यात येणाऱ्या सर्व नोंदी व्यवस्थित आढळुन आल्या तसेच संबंधित रुग्णालयांमध्ये आवक जावक रजिस्टरची नोंदी तपासल्या असता त्या व्यवस्थित आढळून आल्या असून एकंदरच मा. महोदयांनी रुग्णांना देण्यात येणाऱ्य सेवांबद्दल समाधान व्यक्त केले.

रुग्णालयातील सर्व सोयी सुविधा तसेच स्वच्छता या सेवांबद्दल समाधान व्यक्त करुन यापुढेही सोयी सुविधांमध्ये कोणत्याही प्रकारची उणिव राहणार नाही याबाबत सर्व संबंधित अधिका-यांच्या सभेमध्ये सुचित केले. तसेच अकोला जिल्हयातील मृत्यूदर कमी करण्यासाठी रुग्ण व्यवस्थापनात सुयोग्य सुधारणा कराव्यात अशा सुचना दिल्या.
(३) १) अकोल्यातील कोविड संबंधी सर्व रुग्णालयात सर्व सुविधा व्यवस्थितपणे मिळतील याची दक्षता घेण्यात येत आहे.
२) रुग्णालयीन स्वच्छतेकडे विशेष लक्ष देण्यात येत आहे.
३) सर्व रुग्णांना कोविड १९ मार्गदर्शक सुचनांनुसार उपचार दिले जात आहेत.
४) या सर्व व्यवस्थांबाबत वरिष्ठ अधिका-यांमार्फत नियमित आढावा घेतला जात आहे. तसेच सर्व कोविड केद्रांमध्ये औषधे व इतर साधन सामुग्री पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ येथील येलो फिवर रुग्णालय कोविड साठी ताब्यात घेणेबाबत

(३८) १२४२४ (१४-०९-२०२०). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ येथील येलो फिवर रुग्णालय सध्या वापरात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव पाहता परिसरातील इतर रुग्णालयात जागा उपलब्ध नसल्याने महापालिकेस रुग्णालयांची आवश्यकता असल्याचे कळते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे रुग्णांना खासगी रुग्णालयात दाखल व्हावे लागत असून तेथे खर्च जास्त येत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ येथील येलो फिवर रुग्णालय कोविड-१९ या आजाराच्या उपचारासाठी ताब्यात घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राजेश टोपे (१२-०१-२०२१) : (१) हे खरे नाही.
सदर रुग्णालय एअरपोर्ट हेल्थ ऑरगनायझेशन, डायरेक्टर जनरल ऑफ हेल्थ सर्व्हीसेस, हेल्थ ॲन्ड फॅमेली वेलफेअर मंत्रालय, भारत सरकार यांच्या अखत्यारीत येते व सद्य: परिस्थिती मध्ये बाहेर देशात जाणाऱ्या व येणाऱ्या प्रवाशांसाठी येलो फिवर आजारावर लसीकराण केंद्र म्हणून कार्यरत आहे.
(२) हे खरे नाही.
के/पुर्व विभागामध्ये महानगरपालिकेने सेवेन हिल्स हॉस्पीटल, एचबीटी रुग्णालय, कोरोना निगा केंद्र (हॉटेल जेनिसीस आणि पुनम नगर) या ठिकाणी एकूण १६२५ खाटा कोविड १९ रुग्णांसाठी उपलब्ध आहेत.
(३) हे खरे नाही.
(४) सदर बाब एअरपोर्ट हेल्थ ऑरगनायझेशन, डायरेक्टर जनरल ऑफ हेल्थ सर्व्हीसेस, हेल्थ ॲन्ड फॅमिली वेलफअर मंत्रालय, भारत सरकार यांच्या अखत्यारीत येते.
(५) लागू नाही.

ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात कोरोना रुग्ण व इतर आजाराच्या रुग्णाना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याबाबत

(३९) १२४५० (१०-०९-२०२०). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) राज्यभरात कोरोना विषाणूचा संसर्ग वाढत असताना ठाणे जिल्ह्याचे जिल्हा आरोग्य अधिकरी यांनी कोणतेही नियोजन केलेले नसल्याने जिल्ह्याच्या ग्रामीण भागात कोरोना रुग्ण व इतर आजाराच्या रुग्णाना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे माहे एप्रिल-मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, तदनुसार ठाणे जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी कोरोना संसर्गाच्या काळात ठाणे

ग्रामीण भागात नियोजन बध्दतेने काम केले नसल्याने शासनाने त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (१२-०१-२०२१) : (१) हे खरे नाही.
ठाणे जिल्हयामध्ये कोविड - १९ प्रतिबंध व नियंत्रणासाठी पुढील उपाययोजना करण्यात आल्या आहेत.
• वैदयकीय अधिकारी व आरोग्य कर्मचारी यांचे कोविड नियंत्रणाबाबत प्रशिक्षण
• कोरोना संसर्गाबाबत जनतेमध्ये आरोग्य शिक्षण
• परदेशातून येणा-या प्रवाशांचे अलगीकरण व सर्वेक्षण
• बाधित रुग्णाच्या क्षेत्राभोवती प्रतिबंधित क्षेत्र तयार करुन सर्वेक्षण व कार्यवाही.
• पुरेशी क्वारंटाईन सेंटर्स व कोविड-१९ निगा केंद्राची स्थापना.
• प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर आवश्यक औषध पुरवठा व साधन सामुग्री
• कोविड व्यतिरिक्त इतर आरोग्य विषयक सेवा सुरळीत पणे सुरु ठेवणे.
(२) ठाणे जिल्हयात कोविड-१९ प्रतिबंधक व नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या असून राज्य तसेच विभागीय पातळीवरुन यासंदर्भातील आढावा नियमितपणे घेण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

उन्द्री (ता. चिखली, जि. बुलडाणा) येथील ग्रामीण रुग्णालयास मान्यता मिळणेबाबत

(४०) १२६१५ (१०-०९-२०२०). श्रीमती श्वेता महाले (चिखली) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उन्द्री (ता.चिखली, जि. बुलडाणा) येथील ग्रामीण रुग्णालय मंजूर करण्याबाबतच्या मागणीचा निकषानुसार जोड बृहत आराखड्यात समावेश झाल्यानंतर मान्यता देण्याचे आश्वासन मा.आरोग्यमंत्री यांनी दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जोड बृहत आराखडा तयार झाला आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राजेश टोपे (१२-०१-२०२१) : (१) नाही, हे खरे नाही.
मात्र स्थानिक लोकप्रतिनिधी यांचेकडून शासनाकडे विनंती करण्यात आलेली आहे.
(२) बृहत आराखड्याचे काम सुरू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

कळंब (जि.यवतमाळ) येथील ग्रामीण रूग्णालयामध्ये शीतगृहाचे बांधकाम करणेबाबत

(४१) १२८०५ (१६-०९-२०२०). डॉ.अशोक उईके (राळेगाव) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंब (जि.यवतमाळ) येथील ग्रामीण रूग्णालय हे नागपुर-तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावर असल्याने परिसरामध्ये जवळपास कुठेही अपघात झाल्यास ग्रामीण रूग्णालय कळंब येथे यावे लागते परंतु रूग्णांचा मृत्यू झाल्यास सदर रूग्णालयामध्ये शवविच्छेदन गृह नसल्याने मृत व्यक्तीस यवतमाळ येथील शासकीय रूग्णालयामध्ये पाठवावे लागत असल्याचे दिनांक २७ मे २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण रूग्णालयामध्ये शवविच्छेदनगृह बांधकाम करण्यात आले नसल्याने बांधकामा करिता निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, सदर निधी कधी पर्यंत उपलब्ध करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत?

श्री. राजेश टोपे (०८-०१-२०२१) : (१) होय,हे खरे आहे.

(२) व (३) ग्रामीण रुग्णालय, कळंब जि यवतमाळ येथील शवविच्छेदन गृह लहान असल्याने त्यामध्ये मृतदेहासाठी शितपेठी ठेवता येत नाही.शितपेटी ठेवता येईल असे नविन शवविच्छेदन गृह बांधण्याकरीता सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अंदाजपत्रक मागविण्याची कार्यवाही जिल्हा शल्यचिकित्सक, सामान्य रुग्णालय यवतमाळ यांचे स्तरावरून सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

करोनाचा प्रादुर्भाव रोखण्याकरिता लसीच्या संशोधनासाठी निधी उपलब्ध करणेबाबत

(४२) १२८२५ (१०-०९-२०२०). श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतात कोरोना विषाणूच्या संसर्गाचे सर्वाधिक बाधित रुग्ण महाराष्ट्रात आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, करोनाचा वाढता प्रादूर्भाव रोखण्याकरिता कोरोना लसीच्या संशोधनासाठी केंद्र व राज्य सरकारतर्फे किती निधी मंजुर करण्यात आला आहे,

(३) असल्यास, सदर लसीच्या संशोधनासाठी केंद्र व राज्य सरकारकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, याबाबत होण्या-या विलंबाची व दुर्लक्षाची कारणे काय आहेत?

श्री. राजेश टोपे (१२-०१-२०२१) : (१) होय हे खरे आहे.

दि. २४.०७.२०२० अखेर महाराष्ट्रात कोरोनाचे ३,५७,११७ रुग्ण आढळून आले आहेत.

(२) केंद्र सरकारच्या डिपार्टमेंट ऑफ बायोटेक्नॉलॉजी या विभागाच्या मार्फत उद्योग आणि ॲकॅडेमिक विश्व यांच्यामध्ये समन्वय निर्माण होऊन देशहिताचे संशोधन होऊन त्यावर

सार्वजनिक आरोग्य वृध्दीगत होण्यासाठी नवीन लसी, औषध, वैद्यकिय उपकरणे, निर्मितीवर भर देण्यासाठी नॅशनल बायो-फार्म मिशन सुरु करण्यात आलेली आहे. या मोहिमेसाठी २५० दशलक्ष यु.एस. डॉलर्स एवढा निधी मंजूर करण्यात आला असून त्यातील निम्मा निधी जागतिक बँक उपलब्ध करुन देणार आहे हे संशोधन बायोटेक्नॉलॉजी इंडस्ट्री रिसर्च असिस्टंन्स कौन्सिल (BIRAC) यांच्या मार्गदशनाखाली सुरु आहे.

(३) कारोना लसीबाबत डिपार्टमेंट ऑफ बायोटेक्नॉलॉजी झायड्स कॅडिला या औषध कंपनी सोबत काम करत असून जुलै महिन्यामध्ये या लसीच्या क्लिनिकल ट्रायल्स सुरु झाल्या आहेत. तसेच (आयासीएमआर) आणि भारत बायोटेक यांच्या समन्वयातून भारतीय बनावटीच्या लसी संदर्भातही संशोधन सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर जिल्हयात कोरोना या संसर्गजन्य आजाराने मृत्यू झालेल्या ४३ रुग्णांची नोंद प्रशासनाकडे नसल्याबाबत

(४३) १२८२८ (१०-०९-२०२०). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयात कोरोना या संसर्गजन्य आजाराने मृत्यू झालेल्या ४३ रुग्णांची नोंद प्रशासनाकडे नसल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोनो रुग्णाची नोंद प्रशासनाने न ठेवल्याने त्याचा संसर्ग इतर व्यक्तीना होण्याचा धोका निर्माण झाला हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार चौकशीत काय निष्पन्न झाले,

(४) असल्यास, उक्त प्रकरणात दोषी प्रशासकीय अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (१२-०१-२०२१) : (१) हे अंशत: खरे आहे.

कोरोनामुळे झालेल्या मृत्यूंची माहिती संबंधित रुग्णालयांकडे होती. तथापि, सदर माहिती तत्कालीन परिस्थितीत कोविड पोर्टलवर अद्यावत करण्यास विलंब झाला.

(२) हे खरे नाही.

सर्व बाधित रुग्णांच्या रहिवास परिसरात कंटेंमेंटझोन स्थापन करुन सर्वेक्षण आणि इतर प्रतिबंधात्मक कार्यवाही करणे आलेली आहे.

(३) सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे. शहरातील रुग्णांलयामध्ये उपचार घेत असलेल्या रुग्णांची माहिती पोर्टलवर भरण्याची जबाबदारी ही संबंधित रुग्णालयाची आहे. परंतु रुग्णालयाकडून ही माहिती वेळच्यावेळी पोर्टलवर अद्यावय न केल्यामुळे अचुक माहिती

वेळेच्यावेळी प्राप्त झाली नाही. मृत झालेल्या व्यक्तींची माहिती मनपाला दिल्यानंतर त्या मृत व्यक्तीची सर्व कागदपत्रे उपलब्ध न झाल्याने सदर मृत्यूची माहिती पोर्टलवर भरण्यास विलंब झाला.

(४) पोर्टलवर योग्यरित्या माहिती न भरल्यामुळे रुग्णालयाला नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. सदर प्रकरणी सोलापूर महानगरपालिकेच्या आरोग्य अधिकारी व वैद्यकिय अधिकारी यांना झालेल्या अनियमिततेबाबत दोषारोप ठेवुन त्यंना कारणे दाखवा नोटीस बजावण्यासह त्यांची विभागीय चौकशी सुध्दा प्रस्तावित केली आहे. तसेच कोरोना बाधित रुग्ण, मृत रुग्ण यांची अचुक माहिती पोर्टलवर कशा प्रकारे भरावी याबाबतचे पुन: प्रशिक्षण खाजगी रुग्णालय व्यवस्थानास व सर्व संबंधिम रुग्णालयाच्या कर्मचाऱ्यांस देणेत आले आहे. मृत व्यक्तींची माहिती रुग्णालयाकडून पोर्टलवर काळजीपूर्वक नोंद करणेबाबतचे सक्त निर्देश देण्यात आलेलेल आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही

पोलीस अधिकारी, कर्मचारी व राज्य राखीव पोलीस दलाचे जवान यांच्यासाठी कोरोना उपचारासाठी रुग्णालया मधील खाटा राखीव ठेवण्याबाबत

(४४) १३०८६ (१०-०९-२०२०). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) कोरोना विषाणूच्या संसंर्गाच्या काळात राज्यातील रेड झोन मध्ये कर्तव्य बजावत असलेल्या पोलीस अधिकारी, कर्मचारी, राज्य राखीव पोलीस दलाचे जवान यांच्यासाठी रुग्णालय मधील खाटा राखीव ठेवण्याची मागणी लोकप्रतिनिधीनी दिनांक ३ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी रुग्णालय मधील खाटा राखीव ठेवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (१२-०१-२०२१) : (१) या स्वरुपातील मागणी या कार्यालयाकडे करण्यात आली नाही. तथापि पोलीस दलातील कर्मचाऱ्यांसह सर्वासाठी राज्या खाटा उपलबध्द ठेवण्यात आल्या आहेत.

(२) राज्यामध्ये कोरोना रुग्णावरील उपचारासाठी त्रिस्तरीय आरोग्य यंत्रणा निर्माण करण्यात आली आहे. या त्रिस्तरीय आरोग्य यंत्रणेत राज्य भरात २७८४ रुग्णालयात ३,०६,४०० खाटा कोरोना रुग्णांसाठी उपलब्ध आहेत. राज्यभरात १२,६११ आय.सी.यु बेड्स आणि एकूण ४००७ व्हेंटिलेटर उपलब्ध आहेत. ही सुविधा अधिकारी/ कर्मचारी यासह सर्वांसाठी उपलब्ध आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे येथील खाजगी रूग्णालयात कारोनामुळे मृत झालेला बालकाची माहिती आरोग्य विभागास उशिराने कळविल्याबाबत

(४५) १३५१९ (१४-०९-२०२०). श्री.चेतन तुपे (हडपसर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रास्ता पेठ (पुणे) येथील एका खाजगी रुग्णालयात दिनांक ३ जून, २०२० रोजी दाखल केलेल्या दोन महिन्याचा बाळाचा कोरोनामुळे मृत्यू झाला असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयाने या बाळाच्या मृत्यूच्या आठवड्यानंतर पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागाला माहिती दिली असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार शासनाने संबधित दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राजेश टोपे (१२-०१-२०२१) : (१) होय हे खरे आहे.

(२) व (३) सदर रुग्णालयाने बाळाच्या मृत्यूची वार्ता वेळेत दिली होती तथापि मृत्यू बाबतची सविस्तर माहिती डेथ समरी विलंबाने सादर केली.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

विटा (ता.खानापूर,जि.सांगली) येथे उपजिल्हा रुग्णालय करण्याबाबत

(४६) १३५९९ (१०-०९-२०२०). श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विटा (ता.खानापूर,जि.सांगली) येथे उपजिल्हा रुग्णालय उभारणेबाबत स्थानिक लोकांची मागणी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्यस्तिथीमध्ये विटा येथे ग्रामीण रुग्णालय आहे परंतु जिल्ह्याचे ठिकाणी म्हणजे सांगली येथे उपचारासाठी जाण्याकरिता रुग्णांना ७० ते ८० किलोमीटर जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विटा येथील रुग्णांची होणारी गैरसोय लक्षात घेता तात्काळ उपजिल्हा रुग्णालय उभारणेबाबत बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (११-०१-२०२१) : (१) हे खरे आहे.

दि.०३.०९.२०२० रोजी मागणी करणेत आलेली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) निकषाप्रमाणे तपासून कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त पदे भरण्याबाबत

(४७) १३७३० (१४-०९-२०२०). डॉ.किरण लहामटे (अकोले) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकारी उपस्थित असूनही सर्वसामान्य रुग्णाची आरोग्य तपासणी करण्याचे टाळत असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सदर आरोग्य उपकेंद्रामध्ये अनेक रिक्त जागा असल्याचे देखिल निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर उपकेद्रात रुग्णाची तपासणी टाळण्या-या वैद्यकीय अधिकारी व कार्मचाऱ्यांवर कारवाई करण्यासह रिक्त असलेली पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (१२-०१-२०२१) : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

अकोले (जि. अहमदनगर) तालुक्यातील १० प्राथमिक आरोग्य केंद्र, ५ आरोग्य पथके व ७१ आरोग्य उपकेंद्रे कार्यान्वित आहेत. या सर्व आरोग्य संस्थांमध्ये एकुण २३६ पदे मंजूर असून २१७ पदे भरलेली आहेत व १९ पदे रिक्त आहेत.

(३) प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकारी उपस्थित राहत असून सर्व सामान्य रुग्णास नियमित आवश्यक आरोग्य सेवा देत आहेत. वैद्यकीय अधिकारी गट-अ (वेतनस्तर एस-२०) संवर्गातील रिक्त पदांवर बंधपत्रीत वैद्यकीय अधिकारी व जिल्हास्तरीय समितीमार्फत वैद्यकीय अधिकारी कंत्राटी तत्वावर नियुक्त करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. तसेच गट-क व गट-ड संवर्गातील रिक्त पदे भरणेबाबत जिल्हा परिषदेमार्फत जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

रिक्त असलेल्या नियमित पदांच्या ठिकाणी राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी आरोग्य सेवकांमार्फत आरोग्य सेवा पुरविण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात कोरोना या संसर्गजन्य आजारामुळे अत्यावश्यक सेवेतील मृत्युमुखी पडलेल्या कर्मचाऱ्यांना शासकीय योजनाचा लाभ मिळण्याबाबत

(४८) १३७५८ (१४-०९-२०२०). श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना संसर्गजन्य आजारामुळे अत्यावश्यक सेवेतील काही पोलीस, महानगरपालिकेचे अधिकारी, रुग्णालयामधील नर्स, डॉक्टर व कर्मचारी यांचा कोरोनामुळे मृत्यू झाला असल्याची बाब माहे जुलै, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात एकूण किती पोलीस, महानगरपालिका कर्मचारी, रूग्णालया मधील कर्मचारी डॉक्टर मृत्यूमूखी पडले आहेत तसेच त्याची आकडेवारी लपवण्यात येत आहे काय,

(३) असल्यास, शासनाने घोषित केलेल्या ५० लाख विमा कवच द्यावा लागेल म्हणून कोरोनामूळे मृत्यूमूखी पडलेल्या अत्यावश्यसेवेतील व्यक्तींचा मृत्यू लपवण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अत्यावश्यक सेवेत काम करणाऱ्या व्यक्तींचा कोरोनाने मृत्यू झाल्यास पन्नास लाख रुपये व कुटुंबातील एका व्यक्तीस सेवेत घेणार ठरले असताना अद्याप पर्यंत अत्यावश्यक सेवेतील मृत्यूमूखी पडलेल्या एकाही व्यक्तीला अजून पर्यंत शासनाने जाहीर केलेल्या योजनेचा लाभ मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राजेश टोपे (११-०१-२०२१) : (१) हे अंशत: खरे आहे.

दि. २४.०७.२०२० च्या माहितीनुसार सार्वजनिक क्षेत्रातील २ डॉक्टर्स , १ नर्स व ३९ आरोग्य कर्मचारी कोविड संसर्गामुळे मृत्यूमूखी पडले आहेत . तर खाजगी क्षेत्रातील २० डॉक्टर्स, ४ नर्सेस व ११ आरोग्य कर्मचारी मृत्यूमूखी पडले आहेत.

(२) राज्यभरातून २२ डॉक्टर्स, ५ नर्सेस व ५० इतर संवर्गातील कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला आहे.

(३) हे खरे नाही

(४) प्रधानमंत्री गरीब कल्याण पॅकेज योजनेअंतर्गत कोविड आजारावर तपासणी व उपचार करणाऱ्या सर्व डॉक्टर्स व इतर सर्व संबंधीतांना विमा संरक्षण अनुज्ञेय आहे. या योजने अतंर्गत रु.५० लाख इतक्या रकमेचे विमा कवच अनुज्ञेय करण्यात आलेले आहे. दि. २५ जुलै अखेर मृत्यूमूखी पडलेल्या तीन अधिकारी व कर्मचारी यांचे विमा प्रस्ताव मान्य करण्यात आले असून १० विमा प्रस्ताव केंद्र शासनामार्फत विमा कंपनीकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

बोईसर (जि.पालघर) येथील ग्रामीण रुग्णालयाची इमारत धोकादायक स्थितीत असल्याबाबत

(४९) १६५०५ (२६-११-२०२०). श्री.राजेश पाटील (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोईसर (जि.पालघर) येथील ग्रामीण रुग्णालयाची इमारत धोकादायक असल्याचा अहवाल सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर यांनी दिनांक ५ जून, २०२० रोजी वा त्या सुमारास शासनाकडे दिलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधीनी सदरहू रुग्णालयाची पाहणी करुन इमारत धोकादायक असल्यामुळे त्याठिकाणी नव्याने इमारत बांधणे आवश्यक असल्याबाबतची मागणी

निवेदनान्वये मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याकडे दिनांक १५ सप्टेबर, २०२० रोजी वा त्यासुमारास प्रत्यक्ष भेट घेऊन केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बोईसर ग्रामीण रुग्णालयाच्या दुरुस्तीसाठी वा पुनर्बांधणीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (११-०१-२०२१) : (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) बोईसर ग्रामीण रुग्णालयाकरीता जागा प्राप्त झाली आहे. तथापि सदरील जागेवर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कंपाऊड वॉलचे काम सुरु असताना भाभा ऑटोमिक रिसर्च सेंटर, तारापूर यांचेकडून मा. न्यायालयात दावा क्र.१४/२००८ दाखल करण्यात येवून सदरील जागा त्यांचे असल्याबाबत बाजू मांडली. सदरील दाव्याबाबत दिनांक ७.१२.२०१८ रोजी मा. न्यायालयाने स्थगिती आदेश बजावला आहे. याबाबत बाजू मांडण्यासाठी खाजगी वकीलाची नियुक्ती करण्यात आली असून वेळोवेळी झालेल्या सुनावणीच्यावेळी ग्रामीण रुग्णालय, बोईसरसाठी देण्यात आलेली जागा ही रुग्णालयास मिळण्याबाबत मा. न्यायालयात बाजू मांडण्यात आली आहे.

नागपूर जिल्हयातील भूगाव (ता. कामठी), धानला (ता. मौदा), भिष्णुर (ता.नरखेड), सालई गोधनी (ता. नागपूर ग्रामीण) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारती कार्यान्वित करण्याबाबत

(५०) १९१८६ (२१-११-२०२०). ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील भूगाव (ता. कामठी), धानला (ता. मौदा), भिष्णुर (ता. नरखेड), सालई गोधनी (ता. नागपूर ग्रामीण) येथे कोट्यावधी निधी खर्च करुन सन २०१३ मध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्व प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकाम सन २०१७ मध्ये पूर्ण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील ३ वर्षांपासून या सर्व प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचे उद्घाटन न होण्याचे कारणे काय आहेत,

(४) असल्यास, यास जबाबदार असण्या-या अधिका-यावर कारवाई करणेसह सदर आरोग्य केद्र तात्काळ कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राजेश टोपे (१२-०१-२०२१) : (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

सन २०१७ मध्ये सदरील संस्थेचे बांधकाम फक्त ७५ टक्के पुर्ण झाले होते.

(३) सद्यस्थितीत सदर प्राथमिक आरोग्य केंद्रांचे मुळ बांधकाम १०० टक्के झाले असले तरी पाणी पुरवठा व इतर किरकोळ कामे सुरू आहेत.त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सार्वजनिक आरोग्य विभागाकडे इमारतीचे हस्तांतरण अद्याप करण्यात आलेले नाही आहे.तसेच कर्मचा-यांची पद भरण्यात आलेली नसल्याने प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचे उदघाटन झालेले नाही.

(४) जिल्हा नियोजन विकास मंडळामधून ३६.४० लक्ष निधी प्राप्त झाला असून कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग मार्फत साहित्य व फर्निचर खरेदीबाबत निविदा प्रक्रिया झाली आहे.प्राथमिक आरोग्य केंद्रातील कंत्राटी कुशल व अकुशल पदभरतीबाबत कार्यवाही अंतीम टप्यात आहे.तसेच गट अ व गट ब ची नियमित पदे भरण्याची प्रक्रिया शासन स्तरावर सुरू आहे तर गट क व गट ड ची नियमित पदे ग्रामविकास विभागा मार्फत भरण्यात येतील.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन : **राजेन्द्र भागवत**

मुंबई. **सचिव,**

महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.